साक्षीदार क्र **०६** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–देविदास रामदास मेघरे,
वयः–५५ वर्ष, व्यवसाय–शेती,
राह.पिपरा, ता.उमरेड, जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत शपथेवर सुरू.</u>**

१. घटना दि.२७/०८/२०१८ रोजी ग्रामपंचायत पिपरा येथे माझ्या घरी घडली. सदर दिवशी मोक्का चौकशीकामी आरोपींनी सचिव, उपसरपंच कमिटी यांना माझ्या घरी आणले होते. सदर दिवशी माझ्यावर मोक्का चौकशी न लावता मला देवराव मेंघरे, शंकर, रामदासजी व लोभा शिवराम मेंघरे यांनी मारले. त्यापैकी लोभा याने मला काडीने मारले, शंकर व देवराव यांनी मला पकडुन ठेवले होते. लोभा याने मला काडीने माझ्या पाठीवर मारले. त्यानंतर माझ्या डोक्यावर देवराव याने लोखंडी रॉडने मारले. त्यामुळे मी बेहोश पडलो. त्यावेळी मला माझ्या मुलाने उचलले. त्यानंतर माझी पत्नी शालीनी हिला आरोपी चंद्रकला व कल्पना यांनी मारले. माझा मुलगा अनिकेत याला आरोपी रामा व सचिन यांनी काडीने मारले. त्यानंतर माझा मुलगा अनिकेत व प्रितम तेथे आला व त्यांनी मला नागपुर येथे मेडिकलला नेले. त्यानंतर मी तेथे भरती राहीलो.

२. पोलिसांनी माझे बयाण घेतले होते. आरोपीने मला ज्या वस्तुंनी मारहाण केली त्या वस्तु दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला जी. पी.नंबर १९/२०२५ वरील एक काठी व एक लोखंडी रॉड दाखविण्यात आला ते तेच आहे त्यानेच आरोपीने मला मारले होते त्यापैकी काठीला यापुर्वीच एम ओ.०१ व लोखंडी रॉडला एम.ओ.०२ देण्यात आला. ज्या आरोपींनी मला मारहाण केली होती त्यांना पाहिल्यास मी ओळखतो, आजरोजी आरोपी देवराव, शंकर, लोभा, रामा व सचिन इ. आरोपी हजर आहेत. इतर आरोपी गैरहजर आहेत त्यांच्या गैरहजेरीचा अर्ज नि.क्र.४७ वर दाखल, मंजुर, ओळखीबाबत तक्रार नाही. पोलिसांनी माझ्याकडुन कपडे जप्त केले होते. त्यामध्ये एक शर्ट, एक शांडो बनियान जप्त केली होती. आता मला जी. पी.नंबर १९/२०२५ वरील एक शांडो बनियान दाखविण्यात आली ती तीच आहे त्याला यापुर्वीच एम ओ.०४ देण्यात आलेला आहे. आता मला जी. पी.नंबर १९/२०२५ वरील एक पांढरा व त्यावर निळे टिपके असलेला शर्ट दाखविण्यात

आला तो माझाच शर्ट आहे त्याला यापुर्वीच एम ओ.०५ देण्यात आलेला आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपी क्र.१ ते ६ यांच्यामार्फत ॲड.ए.बि.पोंगळे यांच्यामार्फत उलटतपास सुरू.</u>**

३. आरोपी शंकर मेंघरे हा माझा सख्खा मोठा भाऊ आहे व अंबादास हा माझा लहाण भाऊ आहे. माझ्या पत्नीचे नाव शालीनी आहे. माझी पत्नी शालीनी ही ग्रामपंचायत सरपंच होती व त्यांचा कार्यभार हा सन २०१२ ते २०१६ यादरम्यान होता. माझ्या घराच्या पुर्वेला रोड आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्त्याने गावातील लोक शेतीकडे जाणे–येणे करतात व सदर रोडने आरोपीसुध्दा जाणे–येणे करतात. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर पुर्वेकडील रोडवर अतिरिक्त बांधकाम केले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्त्यावर अतिरिक्त बांधकाम केल्यामुळे आरोपी व गावकरी यांनी ग्रामपंचायतकडे तक्रार अर्ज केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर पुर्वेकडील रस्त्यावर अतिरिक्त बांधकाम केल्यामुळे गावातील लोकांना सदर रस्त्याने बैलबंडी नेण्यासाठी अडचण निर्माण होत होती.

४. हे म्हणणे खरे आहे की, गावकरी व आरोपींनी तक्रार अर्ज दाखल केल्यामुळे दि.०६/०७/२०१८ रोजी ग्रामपंचायतकडुन मोक्का मोजणी लागली होती. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, लागली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, सदर प्रत्यक्ष मोजणीच्या दिवशी मी व माझ्या पत्नीने मोजणीला हरकत/अडथडा निर्माण केला होता. हे म्हणणे खरे आहे की, दि.२६/०७/२०१८ रोजी मोक्का मोजणी करण्याकामी आरोपी व गावकरी यांनी ग्रामपंचायतला दुसरा अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर अर्जावरून दि.२८/०७/२०१८ रोजी प्रत्यक्ष मोक्का मोजणी झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर मोजणीकामी ग्रामपंचायत सदस्य,सचिव हजर होते. हे मला माहित नाही की, सदर मोजणी करण्यापुर्वी ग्रामपंचायतने बेला पो.स्टे. यांना रिपोर्ट देऊन पोलिस संरक्षण मागितले होते किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळी मोक्का चौकशी सुरू होती त्यावेळी पोलिस हजर होते.

५. हे म्हणणे खरे आहे की, दुस–या मोक्का चौकशीकामी मी प्रत्यक्ष हजर होतो. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, मला मारले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर दुसरी मोजणी ग्रामपंचायतने केली त्यावेळी मी अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी मोक्का चौकशी सुरु होती त्यावेळी पाऊस आला होता. साक्षीदार स्वत:हून

सांगतो की, रिमझिम पाऊस चालु होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर रोडच्या दोन्ही बाजुने नाल्या आहेत. हे मला माहित नाही की, ज्यावेळी मोक्का चौकशी चालु होती त्यावेळी गावातील लोक हजर होते किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, सदर मोजणीमध्ये मी अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे ग्रामपंचायत सचिवांनी मला सदर अतिक्रमण काढण्यासा सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी चिडुन जाउन माझा मोठा भाऊ शंकर याला मारायला धावलो होतो. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, शंकरच मला मारायला आला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी शंकर याला मारायला गेलो असता माझा पाय नालीमध्ये फसला व मी खाली पडलो त्यामुळे मला मार लागला.

६. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी माझ्याविरूध्द बेला पो.स्टे.ला फिर्याद दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी ग्रामपंचायतविरूध्द सदर न्यायालयामध्ये दावा दाखल केलेला आहे व तो आजरोजी सदर न्यायालयामध्ये प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे नाही की,आमच्या गावात राजकिय गट आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी एका राजकिय पक्षाचा आहे व आरोपी हे एका वेगळ्या राजकिय पक्षाचे आहेत. हे मला माहित नाही की, निवडणूकिच्या वेळी आरोपी हे वेगळ्या राजकिय पक्षाचे असतात किंवा कसे. हे मला माहित नाही की, आरोपीसोबत माझे सन २०१८ पुर्वीपासुनच पटत नाही किंवा कसे. पोलिसांनी माझे बयाण घेतले होते.

७. मी पोलिसांना बयाण देतेवेळेस सांगितले होते की, 'मुलगा अनिकेत याला देवराव मेंघरे आणि सचिन मेंघरे याने हातबुक्कीने मारहाण केली' असे सांगितले होते. आता मला माझे बयाण दाखविण्यात आले त्यामध्ये सदर मजकूर जसाच्या तसा नमुद नाही, तो का नमुद नाही याचे कारण मला सांगता येत नाही. मी पोलिसांना बयाण देतेवेळेस सांगितले होते की, मला आरोपीने पाठीवर मारहाण केली. आता मला माझे बयाण दाखविण्यात आले त्यामध्ये सदर मजकूर जसाच्या तसा नमुद नाही, तो का नमुद नाही याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला कोणत्याही प्रकारे मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, जप्त केलेले शर्ट व शांडो बनियान माझी नाही. एम.ओ.०१ लाकडी काठी व एम.ओ.०२ लोखंडी सळाख हे प्रत्येकाच्या घरी असतात. हे म्हणणे खरे नाही की, मला आरोपीने एम.ओ.०१ लाकडी काठी व एम.ओ.०२ लोखंडी सळाख याने कधीही मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे आरोपीसोबत राजकिय वैर असल्याने

त्यांना फसविण्यासाठी मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि१२/०१/२०२६

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड